# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 370/2022 दिनांक : 25.09.2022

## 1)मो. सा. चोरी :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 22.09.2022 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **जि.प.नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपणीची मो.सा. क्रं एमएच–26/बीपी–478 किंमती 45,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी रवि प्रकाश कांबळे, वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. भगरीथ नगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 339/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1824 केंद्रे, मो.क्रं. 9970381047** हे करीत आहेत.

**2)देगलूर :–** दिनांक 22.09.2022 रोजी 22.30 वा. दिनांक 23.09.2022 रोजी 05.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर लाठकर गल्ली देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पेलंडर प्लस कंपणीची मो.सा. क्रं एमएच–12/एचएक्स–6175 किंमती 25,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी स्वप्निल विश्वनाथ तोटावार, वय 32 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. लाठकर गल्ली देगलूर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरन 451/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 2)मोबाईल चोरी :–

**1)लोहा :–**दिनांक 23.09.2022 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **डी के पाटील कॉलेजच्या जवळ लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा मोटार सायकलवर आपल्या भावास मुंबई येथे जाण्याकरीता शिवाजी चौक लोहा येथे ट्रॅव्हल्स मध्ये सोडून परत गावाकडे जात असताना यातील अनोळखी चार आरोपीतांनी संगणमत करुन त्यांचे कारने फिर्यादीस ओव्हरटेक करुन थांबवले व त्यांच्या सोबत आणलेली बिर्याणी खाऊ घालून ग्रुप फोटो घेतले व सेल्फी काढण्याकरीता फिर्यादी जवळचा मोबाईल घेवून सेल्फी काढून पोहण्याकरीता आमच्या सोबत चल असे म्हणाले असताना फिर्यादीने नकार दिल्याने सेल्फी काढण्याकरीता घेतलेला मोबाईल परत न देता चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी अमोल प्रेमदास राठोड, वय 20 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. सायाळ ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 188/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2325 किरपने, मो.क्र. 9881708474** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–**दिनांक 24.09.2022 रोजी 08.50 वा. चे सुमारास, **B & C कॉलनी नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा पायी जात असताना B & C कॉलनी नांदेड येथे अनोळखी दोन इसम वय अंदाजे 20 ते 25 वर्षे वयोगटातील हे त्यांचे मोटार सायकलवर क्रं. एम.एच./26–एव्ही–0440 वर बसुन आले व माझे खिशातील रेडमी कंपनीचा मोबाईल किंमती 12499/–रुपयाचा चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी देविदास कोंडीबा आक्कमवाड वय 53 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. तिरुमला अपार्टमेंट पालदेवार नगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 324/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2735 खंदारे, मो.क्र. 8551059899** हे करीत आहेत.

## 3)अपघात :–

**मुखेड :–** दिनांक 24.09.2022 रोजी 01.45 वा. चे सुमारास, **जांब ते मुखेड रोडवर व्यंकट भालके यांचे लाकडी मिल जवळ मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद वाहन एस.टी. चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन एस.टी. क्रं. एम.एच./20–बी.एल.–1996 हि हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन यातील मयत यास जोराची धडक देवून **मयत नामे हरिराम श्रीहरी कागदेवाड वय 27 वर्षे व्यवसाय खाजगी नौकरी रा. कळकवाडी ता. कंधार जि. नांदेड** यांना गंभीर दुखापत करुन मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी परसराम संभाजी कागदेवाड वय 27 वर्षे व्यवसाय मिस्त्री रा. कळकावाडी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं. 291/2022 कलम 279,337,338,304(अ),427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री बोधगिरे, मो.क्र. 88059574400** हे करीत आहेत.

## 4)अवैध गुटखा बाळगला :–

**धर्माबाद :–** दिनांक 24.09.2022 रोजी 13.05 वा. चे सुमारास, **मोईजोदीन सलीमोदीन यांचे मोकळया जागेत करखेली ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विवीध कंपणीचा गुटखा किंमती 1,60,700/–रुपयाचा चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री आबेद गौसौदीन सय्यद, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 224/2022 कलम 328,188,272,273, भादवी सह कलम 26(2), 27(30),(2)(अ), 59 अन्न सुरक्षा व मानदे कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री वाडेकर, मो. क्र. 9067081223** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**इतवारा :–** दिनांक 24.09.2022 रोजी 16.05 वा. चे सुमारास, **सलमान बेकरी समोर सार्वजनिक फुटपाथवर शांतिनगर इतवारा, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने आपले ताब्यात विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक लोखंडी खंजर किंमती 500/–रूपयाचा जवळ बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गणेश अशोक गोटके, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 265/2022 कलम 4/25 शस्त्र अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री बिसाडे, मो.क्र. 02462–236510** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 24.09.2022 रोजी 01.30 वा. ते 02.10 वा. चे दरम्यान, **दातार चौक, नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिरट नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 2220/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मिलींद मधुकर सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 356/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/835 बामने, मो.क्र. 8308878094** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**तामसा :–** दिनांक 24.09.2022 रोजी 19.40 वा. चे सुमारास, **गुडलक चिकन दुकानाजवळ शेतमजुरवाडी तामसा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1680/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री बालाजी हौसाजी किरवले, ने. पोस्टे तामसा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 91/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2498 कल्याणकर, मो.क्र. 9284038840** हे करीत आहेत.

## 8)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**विमानतळ :–**दिनांक 24.09.2022 रोजी 11.00 वा. चे सुमारास, **सांगवी बु. नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रशिक विनायक वाढोरे वय 16 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. सांगवी बु. नांदेड,** हा पाणी भरण्यासाठी नळाच्या पाण्याची मोटार लावत असताना विद्युत शॉक लागुन मरण पावला. वगैरे **खबर देणार शेषेराव नारायण वाढोरे , व्यवसाय शेती रा. हारडफ ता. हदगाव जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे विमानतळ** आ. मृ. **28**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2735 खंदारे, मो.नं. 8551059899** हे करीत आहेत.

## 9)पाण्यात बडुन मृत्यु :–

**अर्धापुर :–**दिनांक 23.09.2022 रोजी 23.30 वा. चे सुमारास, **शेतातील विहीरी मध्ये अर्धापुर शिवार ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे चांदु सिताराम मिरासे, वय 35** वर्षे, **रा. मनाठा ता. हदगाव जि. नांदेड,** हा नमुद ठिकाणी पलंगावर झोपला असता त्यास लघुशंका आल्याने उठून लघुशंका करण्यासाठी जात असताना त्याचा पाय घसरुन तो विहीरीत पडल्यामुळे तो पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार सिताराम नारायण मिरासे, वय 62** वर्षे, **व्यवसाय मजुरी रा. मनाठा ता. हदगाव जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे अर्धापुर** आ. मृ. **30**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री डी.एम.राठोड, मो.नं. 9421296377** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 371/2022 दिनांक : 25.09.2022

पोलीस अधिक्षक कार्यालयात " **पंडीत दिनदयाल उपाध्याय** " यांची जयंती साजरी

25 सप्टेंबर, 2022 रविवार रोजी " **पंडीत दिनदयाल उपाध्याय** " या महापुरुषाची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली आहे. **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **पोनि एल.व्ही.राख**, पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले आहे. या प्रसंगी व ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार, कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन पोउपनि श्री उत्तम वाघमारे, पोना/संजय सांगवीकर, पोका विनोद भंडारे यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

